Publication: Sakal
Date: 27/6/2019
Page: 2
Column: 4-6

सकाळ
मुंबई, गुरुवार, २७ जून २०१९

# वीज बिल भरणे होणार अधिक सोपे




मानखुर्द, ता. २६ (बातमीदार) : ग्राहकांना वीज बील भरणे अधिक सोयीचे व्हावे म्हणून अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड वीज वितरक कंपनीने 'जिनियस पे' किऑस्क सुविधा सुरू केली आहे. बिल भरणा करण्यासाठी ग्राहकांना बराच वेळ रांगेत उभे राहावे लागते. त्यामुळे त्यांचा वेळ वाया जातो. ते टाळण्याच्या उद्देशाने कंपनीने अशी सुविधा सुरू केली आहे. त्यामुळे आता रोख, धनादेश किंवा डेबिट-क्रेडिट कार्डच्या माध्यमातून किऑस्कचा वापर करून जलद बिल भरता येणार आहे. वीजबिलाच्या प्रतीदेखील ग्राहकांना मिळतील. सकाळी सात ते रात्री अकरापर्यंत सेवा सुरू राहणार आहे. आमदार सुनील राऊत यांच्या हस्ते विक्रोळीतील टागोर नगरमध्ये सेवेचे उद्घाटन झाले.